महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १८८ वा | दिनांक : १५/०५/२०२५ | वार : गुरूवार

# युद्धबंदीत अमेरिकेची भूमिका काय? - काँग्रेसचा प्रश्न



**नवी दिल्ली :** काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश म्हणाले- गेल्या काही दिवसांपासून काँग्रेस पक्ष विचारत आहे की अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्धबंदीची घोषणा का केली? हे पहिल्यांदाच घडत आहे. पंतप्रधान मोदी यावर काहीही बोलत नाहीत. अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो म्हणतात की अमेरिकेची भूमिका इतकी महत्त्वाची होती की त्यांच्यामुळेच हे युद्ध थांबले. परराष्ट्र मंत्री डॉ. जयशंकरही याचे उत्तर देत नाहीत. आम्ही सतत विचारत आहोत की पंतप्रधान मोदी आणि परराष्ट्र मंत्री अमेरिकेची भूमिका काय आहे याचे उत्तर का देत नाहीत?"

ते म्हणाले- काश्मीरवर फक्त भारतीय संसदेतच चर्चा होऊ शकते. यामध्ये मध्यस्थी करण्याचा अधिकार कोणालाही नाही.

आम्ही आमच्या सैन्यासोबत पर्वतासारखे उभे आहोत. दहशतवादाविरुद्ध आणि पाकिस्तानविरुद्ध केल्या जाणाऱ्या कारवाईला आम्ही पूर्ण पाठिंबा देत आहोत. आम्ही सर्वपक्षीय बैठक बोलावण्याची मागणीही केली आहे. दोन सर्वपक्षीय बैठका झाल्या, परंतु दोन्ही बैठकींमध्ये पंतप्रधान मोदी उपस्थित नव्हते... काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्यावर चर्चा करण्यासाठी संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्यासाठी पंतप्रधान मोदींना पत्र लिहिले आहे.

१० मे रोजी भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्धबंदीची घोषणा करण्यात आली. त्यानंतर दुसऱ्या दिवशी काँग्रेसने दिल्लीतील त्यांच्या मुख्यालयाबाहेर 'इंदिरा होणे सोपे नाही' असे लिहिलेले पोस्टर लावले.

या पोस्टरसोबत १९७१ च्या युद्धात पाकिस्तानने केलेल्या आत्मसमर्पणाचे फोटोही लावण्यात आले होते. पोस्टरवर 'इंडिया मिसेस इंदिरा' असे शब्दही लिहिले होते.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी पंतप्रधानांना पत्र लिहून संसदेचे विशेष अधिवेशन तात्काळ बोलावण्याची विनंती केली आहे.

काँग्रेसचे सरचिटणीस सचिन पायलट यांनी भारत आणि पाकिस्तानमधील अमेरिकेच्या मध्यस्थीवर प्रश्न उपस्थित केले. ते म्हणाले- अमेरिका दोन दिवसांपूर्वी म्हणते की त्यांचा या मुद्द्याशी काहीही संबंध नाही, त्यानंतर अचानक वॉशिंग्टनकडून युद्धबंदीची घोषणा केली जाते, ज्यामुळे अनेक प्रश्न उपस्थित होतात.

सचिन पायलट म्हणाले की, भारत सरकारने सर्वपक्षीय बैठक बोलावावी जी गेल्या दोन बैठकांमध्ये झाली नाही. आपण त्याबद्दल बोलले पाहिजे. पंतप्रधानांनी या सर्वपक्षीय बैठकीला यावे आणि संपूर्ण देशाला आणि पक्षांना विश्वासात घ्यावे, कारण सर्व पक्षांनी त्यांच्या विचारसरणी बाजूला ठेवून भारत सरकारला पूर्ण पाठिंबा दिला होता.

पंतप्रधान मागील सर्वपक्षीय बैठकांना उपस्थित राहू शकले नाहीत. अशा परिस्थितीत, देशाला आणि विरोधी पक्षाला विश्वास मिळावा म्हणून आणखी एक सर्वपक्षीय बैठक बोलावली पाहिजे. कोणत्या अटींवर युद्धबंदी झाली आहे हे सरकारने सांगावे? भविष्यात अशा प्रकारची घटना घडणार नाही याची काय हमी आहे?

# शरद पवार-अजित पवार एकत्र असल्याचे माझ्याकडे पुरावे : बच्चू कडू यांचे विधान



**नागपूर :** मागील काही दिवसांपासून राजकीय वर्तुळात शरद पवार आणि अजित पवार एकत्र येणार असल्याची चर्चा सुरू आहे. शरद पवार यांनी देखील याबाबतचा निर्णय सुप्रिया सुळे घेतील, असे वक्तव्य केल्याने या चर्चेला अधिक जोर आला आहे. या पार्श्वभूमीवर प्रहार जनशक्ती पक्षाचे प्रमुख बच्चू कडू यांनी प्रतिक्रिया देत मोठा दावा केला आहे. शरद पवार व अजित पवार एकत्र येण्याची गरज काय? ते आधीपासून एकत्र असल्याचे असल्याचे बच्चू कडू म्हणाले.

शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या मागणीसाठी प्रहार संघटनेच्या वतीने नागपूरमध्ये रक्तदान आंदोलन केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या धरमपेठ येथील घरचे काही मीटर अंतरावर असलेल्या ट्राफिक पार्क येथे हे आंदोलन पार पडले. या आंदोलनानंतर माध्यमांशी बोलताना बच्चू कडू यांनी उपरोक्त दावा केला आहे.

शरद पवार व अजित पवार एकत्र येण्याची गरज काय? असा सवाल करत ते आधीपासून एकत्र असल्याचे बच्चू कडू म्हणाले. दोन्ही पवार एकत्र असल्याचे माझ्याकडे अनेक पुरावे आहे, असा दावाही बच्चू कडू यांनी केला. जशी चाणक्य नीती आहे, तशी पवार नीती असल्याचे ते म्हणाले.

याशिवाय, कडूंनी राज्य सरकारवर आणि भाजपवरही जोरदार टीका केली. कोकण व मुंबईतील मराठी मतदारांची नावे मतदार यादीत दोन्हीकडे असलेल्या नागरिकांना मुंबईत मतदान करण्यापासून रोखण्याचा भाजपचा डाव असल्याचा आरोप त्यांनी केला. यासाठी भाजप नवीन परिपत्रक आणण्याच्या तयारीत असल्याचा दावाही त्यांनी केला. दोन ठिकाणी मतदान केल्यास दंडात्मक कारवाई करण्याच्या तयारीही राज्य सरकारने दर्शवली आहे. मतदार कार्ड आधारशी लिंक हा त्याचाच एक भाग असल्याचे बच्चू कडू म्हणाले. भाजप औरंगजेबासारखे मराठी माणसावर चालून येत असल्याचेही ते म्हणाले.

शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या मुद्द्यावरही बच्चू कडूंनी सरकारला धारेवर धरले. नागपूरमधील धरमपेठ परिसरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या घराजवळ त्यांनी 'रक्तदान आंदोलन' केले. राज्यकर्त्यांना बोलते करण्यासाठी आम्ही रक्तदान आंदोलन करत असल्याचे असे ते म्हणाले. आता कर्जमाफी केली तर मतदार विसरुन जाईल, म्हणून राज्य सरकार कर्जमाफीसाठी येणाऱ्या निवडणुकीची वाट पाहत असल्याचा आरोप बच्चू कडू यांनी केला आहे.

# दोन्ही राष्ट्रवादी गटांच्या एकत्रीकरणाच्या चर्चा केवळ मिडियातच - अनिल देशमुख



**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या संभाव्य एकत्रीकरणाच्या चर्चांना शरद पवार यांच्या वक्तव्यानंतर वेग आला असतानाच, माजी गृहमंत्री आणि शरद पवार गटाचे ज्येष्ठ नेते अनिल देशमुख यांनी या चर्चांवर स्पष्टीकरण दिले आहे. सध्या अशा कोणत्याही चर्चा पक्षाच्या पातळीवर सुरू नाहीत, या चर्चा फक्त मिडियात आहेत, असे स्पष्ट करत त्यांनी राजकीय गोंधळावर काहीसा पडदा टाकण्याचा प्रयत्न केला.

यापूर्वी शरद पवार यांनी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस गट एकत्र आले, तर आश्चर्य वाटू नये असे विधान केले होते. यामुळे एकत्रीकरणाच्या शक्यतेवर राजकीय चर्चा तापल्या होत्या. मात्र, अनिल देशमुख यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, प्रत्यक्षात राजकीय पातळीवर कोणतीही चर्चा सुरू झालेली नाही. अजित पवार गट म्हणतोय की ही माहिती शरद पवार गटातून पेरली जात आहे. पण मी स्पष्टपणे सांगतो की ही चर्चा फक्त मिडियामध्ये आहे.

पत्रकारांनी तुमच्या मनात नेमकं काय आहे? असा प्रश्न विचारताच अनिल देशमुख यांनी मिश्कील शैलीत उत्तर दिले — जवळ या, तुमच्या कानात सांगतो... त्यांच्या या हलक्याफुलक्या प्रतिसादामुळे उपस्थितांमध्ये हास्याची लाट पसरली, मात्र त्याचबरोबर राजकीय वर्तुळात नव्या चर्चांना तोंड फुटले.

देशात राष्ट्रवादी काँग्रेसचे नेतृत्व सुप्रिया सुळे यांनी तर राज्यात अजित पवारांनी नेतृत्व करावे, अशी कार्यकर्त्यांची मागणी आहे. याबाबत विचारले असता अनिल देशमुख म्हणाले की, सुप्रिया सुळे आमच्या राष्ट्रीय कार्याध्यक्ष आहेतच, त्या खासदार देखील आहेत. त्या वरिष्ठ नेत्या आहेत. त्यामुळे काही प्रश्नच नाही. दरम्यान, दोन्ही गट एकत्र येण्यासंदर्भात सध्या कुठलीही चर्चा नाही.

शिवाय, केंद्रात सुप्रिया सुळे यांना कॅबिनेटमंत्रिपद सुद्धा मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. म्हणून दोन्ही राष्ट्रवादी एकत्र असल्यास कार्यकर्ता म्हणून स्वागत करतो. एकत्र आलेल्या राष्ट्रवादीमध्ये अजित पवारांचे नेतृत्व मान्य करून पुढची वाटचाल करायला हरकत नसल्याचे प्रवक्ते अमोल मिटकरी यांनी सांगितले आहे. त्यासोबतच दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्यास केंद्रात आणि राज्यातील राजकारण भक्कम होणार असल्याचेही ते म्हणाले.

शरद पवारांनी म्हटले होते की दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्यावर सुप्रिया सुळे किंवा इतर मंडळी निर्णय घेतील. यावर दोन दिवसांपूर्वी बोलताना रोहित पवार म्हणाले की, यावरून एक गोष्ट लक्षात घ्या की शरद पवार साहेब आता कुठेतरी सांगत आहेत की पुढच्या पिढीला आम्ही काही जबाबदारी देणार आहोत. पुढची पिढी याबाबत निर्णय घेतील. सुप्रिया ताई या कार्याध्यक्ष आहेत, त्यांच्याकडे देशाची देखील जबाबदारी तिथे आहे. सुप्रिया ताई जेव्हा बैठक घेतील त्या बैठकीत काय निर्णय घेतला जातो हे मी नक्कीच तुम्हाला सांगेल.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १५ मे २०२५

## ऑटो चालकाचा मुलगा प्रथमेश शंभर टक्के गुण घेऊन "विदर्भ टॉपर" !



**दिग्रस (महेश मुंढे) :** दिग्रस येथील प्रथमेश साहेबराव इंगोले या गरीब व ग्रामीण भागातील ऑटो चालकाच्या मुलाने दहावीत शंभर पैकी शंभर टक्के गुण प्राप्त करून संपूर्ण विदर्भातून प्रथम येण्याचा बहुमान प्राप्त केल्याने त्याचेवर कौतुक व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.तो स्थानिक दिनबाई विद्यालयाचा विद्यार्थी आहे. प्रथमेश इंगोलेच्या घराची आर्थिक परिस्थिती जेमतेम असून ते लगतच्या लायगव्हान येथील मूळ रहिवासी आहे.परिवाराच्या उदरनिर्वाहासाठी त्याचे वडील ऑटो चालवत असून,संपूर्ण कुटुंब दिग्रस येथे स्थायिक झाले आहे. प्रथमेश इंगोलेने गणित व विज्ञान आणि तंत्रज्ञान या दोन विषयात १०० पैकी १०० गुण मिळविले.मराठी व सामाजिक शास्त्रे या विषयात त्याला ९९ गुण पडले. इंग्रजी व हिंदीमध्ये त्याने क्रमशः ९७ व ९८ गुण मिळवून शाळा तसेच परिवाराला संपूर्ण विदर्भात लौकिक मिळवून दिले . त्याने ६०० पैकी ९८.८२ च्या सरासरीने एकूण ५९३ गुण प्राप्त केले, तर "बेस्ट ऑफ फाईव्ह" प्रकारात त्याला १०० पैकी १०० गुण आहे. प्रथमेश इंगोले बॉल-बॅडमिंटनचा उत्कृष्ट खेळाडू असून त्याने आपली शाळा व यवतमाळ जिल्हा संघाचे राज्यस्तरीय स्पर्धेत प्रतिनिधित्व केले होते . क्रीडेच्या चार गुणांची वाढ झाल्याने त्याची टक्केवारी "बेस्ट ऑफ फाईव्ह" प्रकारात १०० पैकी १०० झाली आहे. प्रथमेश इंगोलेने आपल्या यशाचे श्रेय दिनबाई विद्यालयाचे मुख्याध्यापक शशिकीरण कुंडकर,उपमुख्याध्यापक प्रदीप चोपडे ,पर्यवेक्षक मनोज क्षीरसागर ,इतर सर्व शिक्षक व आईवडीलांना दिले आहे.संपूर्ण विदर्भात शाळेला लौकिक मिळवून दिल्याबद्दल त्याचेवर कौतुक व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे .

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

## शहरात महात्मा बसवेश्वर वादळ, भव्यदिव्य मिरवणुकीने उत्सवाची सांगता संपन्न



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** क्रांतिसूर्य जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर जयंती उत्सवानिमित्त मुरूम येथील महात्मा बसवेश्वर मध्यवर्ती जयंती उत्सव मंडळाच्या वतीने दि.०७ वार बुधवार रोजी महात्मा बसवेश्वर यांच्या सिंहासनावर आरूढ पूर्णाकृती पुतळ्याची शहरातील मुख्य मिरवणूक मार्ग- महात्मा बसवेश्वर चौक,अण्णाभाऊ साठे चौक,अशोक चौक,टिळक चौक,किसान चौक,सुभाष चौक,गांधी चौक,हनुमान चौक मार्गे भव्यदिव्य मिरवणूक व महाकालीचे देखाव्याचे सादरीकरण करत जयंती उत्सवाची सांगता संपन्न झाली. महाकाली देखावा कलाकारांनी प्रमुख चौकात आपल्या कलाकारी अदाने नागरिकांची मने जिंकली. शहर व परिसरातील बसव भक्तांनी या मिरवणूक सोहळयात उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला होता. फटकड्याच्या आतिषबाजी, महात्मा बसवेश्वरांच्या जयघोष करत मुरूम शहर महात्मा बसवेश्वर वादळ अवतरला होता. मंडळाचे आधारस्थंभ दत्ता हुळमजगे यांच्या मार्गदर्शनाखाली अध्यक्ष पृथ्वीराज गिरिबा,उपाध्यक्ष ओंकार पाटील, सचिव राजकुमार वाले, गौरीशंकर बोंगरगे, शिवा दुर्गे, धनंजय मूदकण्णा, ओंकार कुंभार, वैभव गव्हाणे, नमन मूदकण्णा, वैभव मूदकण्णा,नागेश मूदकण्णा, प्रदीप गव्हाणे सह बसव भक्तांनी जयंती उत्सव यशस्वीपणे पार पाडण्यासाठी परिश्रम घेतला. भव्यदिव्य मिरसणुकीचे सुत्रांचालन पंकज पाटील यांनी केले. उपविभागीय पोलीस अधिकारी सदाशिव शेलार, मुरूम पोलीस स्टेशनचे सहायक पोलिस निरीक्षक संदीप दहिफळे यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या प्रमाणात पोलीस फौज तैनात करण्यात आला होता. मिरवणुकीत बसव भक्तांनी तुफान गर्दी केली होती. भव्यदिव्य मिरवणुकीने जयंती उत्सवाची सांगता संपन्न झाली.

# राष्ट्रीय कबड्डीपटू : मा. प्रभाकरभाऊ गिते





अकोला निकळक हे बदनापूर जि. जालना जिल्ह्यातील एक लहान खेडेगाव. बदनापूर पासून हाकेच्या अंतरावर असलेले. बहुतांश शेतकरी पार्श्वभूमी असलेले. उत्तम शेती करणारे अनेक शेतकरी या परिसरात आपला नावलौकिक ठेवून आहेत. आजही गावात एकत्र कुटूंब पद्धतीने जगणारे , वागणारे अनेक कुटूंब आहेत. गावात गिते, केकान, तांबे, मुंढे, खेडकर या आडनावाची माणसं आहेत. याच गावातील गिते कुळात नामवंत व ख्याती प्राप्त प्रगतशिल शेतकरी स्व. रखमाजी पा. गिते होऊन गेले. शेतीनिष्ठ शेतकरी. त्यांना पाच मुले व एक मुलगी होती. त्यापैकी सर्वात थोरला मुलगा म्हणजे स्व. प्रभाकर भाऊ गिते. सर्व गाव व जिल्हयात ते परभू भाऊ गिते म्हणून प्रसिद्ध होते. ते एक कुशल संघटक, ध्येयवादी व विकास प्रेमी , प्रभावी वक्तृत्व व नेतृत्व असलेले अत्यंत धाडसी व कर्तबगार असे व्यक्तिमत्व होते. पिळदार शरिर, उंच बांधा, गोरेपान आणि प्रचंड करारी असा त्यांचा बाणा होता. देखणे व राजबिंडे व्यक्तिमत्व त्यांना लाभले होते. ते उत्तम कबड्डी पटू व अकोला गावचे अनेक वर्ष सरपंच होते. राजकीय, धार्मिक, सामाजिक कार्यात त्यांचा सहभाग असे. मदतीला तत्पर धाऊन जाणे आणि अन्यायाच्या विरुद्ध उभे राहाणे हा त्यांचा स्वभाव होता. त्यामुळेच ते सर्वत्र लोकप्रिय होते. राजकीय क्षेत्रात त्यांचा दबदबा होता. अनेक राज्यस्तरीय , राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत त्यांनी पारितोषीके प्राप्त करून जालना जिल्हयाचा व आपल्या गावाचा नावलौकिक वाढविला होता. त्यांचा कबड्डी खेळ पहाण्यासाठी लोक गर्दी करत. त्यांना पकडणे शक्य नसे. सहा फुट उंच उडी मारून ते चढाई करीत. अतिशय चपळ ते खेळाडू होते. अंगात प्रचंड रग होती. अकोला येथील जि.प. शाळेत मिरजकर नामक शिक्षक त्या काळी होते. त्यांनीच अकोला येथे कबड्डीची परंपरा निर्माण केली. त्यातून अनेक खेळाडू घडले, नामवंत झाले त्यापैकीच एक कोहिनूर हिरा म्हणजे स्व. प्रभूभाऊ होते. प्रभू भाऊंनी अनेक कबड्डी पटू घडवले त्यांना प्रेरणा दिली. कबड्डी पटूंचे गाव म्हणून अकोला नि. आजही ओळखले जाते. ही ओळख त्यांनी व इतर खेळाडूंनी मिळवून दिली. गावात जय किसान क्रिडा मंडळाची स्थापना करून आदर्श घालून दिला. त्यातून प्रेरणा घेवून या परिसरात कबड्डी खेळांची समृद्ध परंपरा निर्माण झाली. ती आजही सुरू आहे. खेळ, शिक्षण आणि शेती हे त्यांच्या आस्थेचे विषय होते. साई समर्थ बहुउद्देशिय संस्थेची स्थापना करून त्यांनी आपल्या गावी साईबाबा माध्यमिक विद्यालय सुरू केले. आज हजारो विद्यार्थी त्यांच्या संस्थेत शिक्षण घेत आहेत. भाऊंचा सहवास व मार्गदर्शन मला विद्यार्थी असतांना लाभले होते. शिक्षणाची व कबड्डी ची प्रेरणा मला त्यांच्याकडून मिळाली होती. अकोला येथे त्यांच्या घरी मी दरवर्षी सुट्यात जात असे. सुशिक्षीत असे ते घराणे होते. माझ्या विषयी त्यांना खूप प्रेम व अभिमान होता.तसाच मलाही त्यांच्या विषयी. त्यांच्या मातोश्री स्व. कडताबाई गिते यांनी व भाऊंनी मला कायम आशिर्वाद दिले. असे आमचे स्नेही आमचे भाऊ म्हणजे आमचा अभिमान होते. एक राष्ट्रीय खेळाडू, उत्तम संघटक, आदर्श शेतकरी, आणि नामवंत सरपंच म्हणून ते कायम सर्वांच्या स्मरणात राहील. सरपंच असतांना त्यांनी आपल्या अकोला या गावी खूप मोठे विकास कामे केलीत. गावाला निश्चित अशी दिशा दिली. गावातील विद्यार्थी, युवक यांना प्रेरणा देवून विकासाच्या मार्गावर मार्गस्थ केले. त्यांचे अकोला पंचक्रोशिसह जिल्हाभरात फार मोठा मित्र परिवार होता. नातेसंबंध व मैत्री जपण्याचे प्रयत्न त्यांनी जिवनाच्या अखेरच्या क्षणापर्यंत केले. प्रभाकरराव गिते हे क्रिडा व राजकीय , सामाजिक क्षेत्रातले चालते बोलते विद्यापीठ होते. त्यांना मानणारा व ओळखणारा फार मोठा चाहता वर्ग सर्वत्र दिसून येतो. कुठेही राजकीय, सामाजिक कार्यक्रम असो की कौटुंबिक कार्यक्रम यात त्यांची उपस्थिती असायचीच. पिळदार शरिर, उंच बांधा, मजबूत शरिरयष्टी, भारदार व कणखर आवाज पांढरे शुभ्र कपडे, नेहरू शर्ट, धोतर, डोक्यावर गांधी टोपी प्रचंड सत्यवादी व परखड असे प्रभाकर भाऊंचे व्यक्तिमत्व होते. मी लहानपणी त्यांच्या घरी अनेकदा वेगवेगळ्या निमित्ताने जात असे. विशेषतः उन्हाळ्याच्या सुट्टीत मी आठपंधरा दिवस त्यांच्या कडे मुक्कामी असे. एकत्र कुटूंब असल्यामुळे त्यांच्या घरी मुलांचा फार मोठा गोतावळा असायचा. आम्ही सर्व मुले त्यांच्या शेतात दिवस रात्र पडलेले असायचो.एकत्र कुटूंबात वाढले जन्मले असल्यामुळे त्यांचे संस्कार त्यांच्यावर झाले. नकळत तेच संस्कार पुढच्या पिढीवर ही झाले. प्रभाकर भाऊंचे मला विशेष वाटायचे ते उत्तम कबड्डी पट्टू होते . त्यांची कबड्डी पट्टू म्हणून महाराष्ट्राला ओळख होती. त्यांच्याकडून उच्च शिक्षण व कबड्डीचे संस्कार व प्रेरणा मी घेतली. मलाही विद्यार्थी दशेत कबड्डीची आवड निर्माण झाली ती भाऊमुळेच. आजही त्या भागातील लोक त्यांच्या अनेक आठवणी सांगतात. असा माणूस आता त्या परिसरात होणार नाही.वाघाचे काळीज असलेले ते व्यक्तिमत्व आमच्यासाठी व हजारो क्रीडा प्रेमीसाठी कायम प्रेरणादायी आहे. प्रभाकरभाऊ गिते हे राष्ट्रीय कबड्डी पटू होते. एक उत्तम व आदर्श खेळाडू, प्रभावी वक्ते, कुशल संघटक, आदर्श ग्राम विकासाचे शिल्पकार, मैत्री जपणारे,संयुक्त कुटूंब पद्धतीचे प्रेरणास्थान, बंधूप्रेमी, गाव व समाजप्रेमी आणि राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मार्गदर्शक म्हणून त्यांची नोंद जालना जिल्ह्याच्या इतिहासात होईलच. भाऊंच्या स्मृतिस विनम्र अभिवादन !

**प्रा. डॉ. शिवाजी हुसे- कन्नड**

# प्रतिभा निकेतन विद्यालय, भुसणी शाळेचा शंभर टक्के निकाल




**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांच्या मार्फत घेण्यात आलेल्या फेब्रुवारी ,मार्च २०२५ मध्ये एस.एस.सी. परीक्षा घेण्यात आल्या होत्या. या परीक्षेचा निकाल दिनांक १३-५-२०२५ रोजी लागला आहे. या परीक्षेमध्ये विद्यालयाचा१००% निकाल लागला आहे. सतत तीन वर्षे शंभर टक्के निकालाची हॅट्री करण्यात आली आहे. विद्यालयातील १० विद्यार्थी विशेष प्राविण्य असे उत्तीर्ण झाले आहेत. १५ विद्यार्थी विषय प्रथम श्रेणीत पास झाले आहेत. द्वितीय श्रेणीत४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. प्रशाल्यातून प्रथम येण्याचा मान कुमारी सानिया वजीर मुल्ला ८६.६० द्वितीय क्रमांक कुमारी लक्ष्मी राजेंद्र जामगे ८६.०० तृतीय क्रमांक कुमारी बनसोडे श्रुती तानाजी ८५.२० या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन माजी मंत्री बसवराजजी पाटील ,संस्थेचे अध्यक्ष श्री बापूरावजी पाटील काका, युवा नेते शरणजी पाटील भैय्या, संस्थेची सचिव व्यंकट जाधव गुरुजी, शाळेचे मुख्याध्यापक तात्यासाहेब शिंदे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी केले.

# पाकिस्तान

पाकिस्तान कायर भडवा है।
हिंदुस्तान सच्चा कडवा है॥
पाकिस्तान तेरी अब खैर नही।
हिंदूस्तान का किसी से बैर नही॥



पाकिस्तान आतंक की है जड।
करम के फल भोगेगा सडसड॥
पाकिस्तान में नही है रे दम।
निहथ्थो पे करे वार पुछे धरम॥

पाकिस्तान हिजडों की औलाद।
भारतीय सेना करेगी तुम्हे बरबाद॥
जग के नक्षे से मिटेगा पाकिस्तान।
हिंदुस्तान था, है, रहेगा सदा महान॥

**राष्ट्रीय कवी - संजय मुकुंदराव निकम**
मालेगाव जि.नाशिक
मो. 86574 88426

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस
डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103

# विद्यार्थ्यांनो यशाने हुरळू नका अन्‌अपयशाने खचू नका - डॉ. शिवाजी हुसे

नुकतेच दहावी - बारावी परीक्षेचे निकाल जाहीर झाले आहे. सर्व विद्यार्थ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन व पुढील वाटचालीस खूप खूप शुभेच्छा !नव्वदच्या दशकात मुलगा - मुलगी दहावी - बारावी पास होणं ही फार मोठी गोस्ट समजली जायची. ग्रामीण भागात शिक्षणाच्या फारशा सुविधा उपलब्ध नव्हत्या. दोनचार व त्याही पेक्षा जास्त कि.मी. अंतर पायी चालत जावून मुलं शिकायची. घरची परिस्थिती ही बेताचीच असायची. शेतमालाला भाव नसायचा, शिवाय उत्पादन ही फार होत नसे. शेतीवर उदरनिर्वाह साधने अवघड होत असे. घरात फारसे कुणी शिकलेले नसे. त्यामुळे मार्गदर्शनाचा प्रश्नच नव्हता. कोणतेही क्लासेस नाही की अतिरिक्त शिकवण्या ही नाही. ग्रामीण भागातील विद्यार्थांना नवी पुस्तके घेणेही परवडत नसे. गावातच जुनी पुस्तके विकत घेवून कसा बसा अभ्यास करावयाचा. काहीच मुलांना चांगले गुण मिळायचे. त्यावेळी 50 ते 60 टक्के गुण म्हणजे खूप गुण मिळवल्या सारखे होई. सत्तर ते पंच्चाहत्तर टक्के घेणारा विद्यार्थी विभागातून पहिला असायचा. जे गुण मिळत ते अभ्यासाचे असत. त्यामुळे दहावी चा निकाल लागला की गावात व पंचक्रोशीत चर्चा व्हायची. मुलं मारोतीच्या मंदिरात नारळ फोडायची तर गरीब मुलं केवळ साखर वाटून आपला आनंद साजरा करायची. किमान महिनाभर निकालाची चर्चा व्हायची. नापास मुलांचीही चर्चा व्हायची. नापास मुले ही पुन्हा कसोशिने अभ्यास करून पास व्हायची. आपली जिद्द व प्रयत्न सोडायचे नाहीत. गावातील सरपंच, चेअरमन, ग्रा.पं. सदस्य, शिक्षक, कर्मचारी हे मुलांना आयटी आय करण्याचा सल्ला द्यायचे. काही मुले तंत्र निकेतन ला जायची. काही डी.एड. ला तर काही कृषी विद्यालयात प्रवेश घ्यायची. अकरावी बारावी करणाऱ्यांची संख्या नगण्यच असत. डीएड. केल्यावर झटपट नोकरी असायची. त्यामुळे डि एडला खूपच महत्व असे. कमी वयात नोकरी मिळायची. चांगल्या कुटूंबातील मुलगी मिळायची. कमी वयात स्थिरता यायची. आयटीआय झालेली मुले कंपनीत नोकरीस लागायची. कृषी पदवीका घेतलेली मुले तलाठी - ग्रामसेवक व्हायची. शिक्षका पेक्षा ग्रामसेवक जास्त पैसे कमवायचे. त्यामुळे त्यांची समाजात क्रेझ होती. काहीच न करणारी दहावी पास नापास मुले ड्रायव्हर व्हायची. कंपनीत कामगार म्हणून काम करायची. काही मुले घरची शेती किंवा मजूरी करायची. शिलाई मशिन घेवून ट्रेलर म्हणून काम करायची. काही मुले गवंडी व्हायची. एवढीच क्षेत्रे त्या काळी विशेषत: ग्रामीण भागातील विद्यार्थ्या समोर होती. शहरातील मुले छोट्या मोठ्या नोकऱ्या करायची. काही मुले ही एस.टी.कंडक्टर, ड्रायव्हर व्हायची. तर काही सैन्यात भरती व्हायची. हे चित्र सार्वत्रिक होते. या काळात ग्रामीण भागातील मुले शिक्षण संस्था, व अन्य क्षेत्रात नोकरीस आली. त्यानंतर डीएड बारावीवर झाले. खेडोपाडी डीएड कॉलेज झाले. अगदी ढाब्यावर कॉलेज झाले. पैसे कमवण्याचे व झटपट मोठे होण्याचे मार्ग म्हणून डीएडकडे पाहिल्या जाऊ लागले. पर्यायाने बेकारी खूपच वाढली. डीएडचा प्रभाव कमी होत गेला. इंजिनियरिंग व मेडिकलला महत्व आले. क्लासेस चे पेव फुटले. गुणावर गुणवत्ता ठरवली गेली. त्यातून काही मुले घडली,. अन्य मुले महाविद्यालयीन शिक्षण घेवून स्पर्धा परिक्षेच्या माध्यमातून नोकरीत जाऊ लागली अर्थात क्लास थ्री व क्लास फोर च्या नोकऱ्या. आजच्या काळात प्रचंड स्पर्धा वाढली. पालक मुलात गुंतवणूक म्हणून पाहू लागले. बापाची धनवत्ता ही मुलाची गुणवत्ता ठरवू लागली. श्रीमंताची मुले महागड्या शाळेत व क्लासेसला जावू लागली. इंग्रजी माध्यमा ला अवास्तव महत्व दिले गेले. इंग्रजी शिक्षणा शिवाय पुढे जाऊच शकत नाही ही भावना बळावत गेली. भांडवलदार उद्योजक वर्ग शिक्षण क्षेत्राकडे वळला. त्यातून प्रचंड पैसे कमावला. इंग्रजी शाळेचे खेडोपाडी पेव फुटले. जास्त फिसची शाळा प्रतिष्ठेची बनली. मुलापेक्षा मायबापाना आपल्या प्रतिष्ठा महत्वाच्या वाटू लागल्या. समाजात सांगण्यासाठी ते महत्वाचे वाटू लागले. पालकांना खूष करण्यासाठी शाळेत सर्वच मुलांन 90 टक्या पेक्षा जास्त गुण दिले जावू लागले. त्यामुळे खोटी गुणवत्ता पुढे येवू लागली. मायबाप हुरळून जावू लागले. मात्र हीच मुले पुढे स्पर्धेत टिकत नाही. त्यामुळे मुले नैराश्यात जातात. घरीदारी अपमान सहन करावा लागतो. निवडक मुलं यशस्वी होऊ लागली. बाकी मुले डिप्रेशन मध्ये जावू लागली. गुणवत्ता ही दुर्मिळ गोस्ट आहे. आज नापास मुले शोधूनही सापडत नाही. दहावी बारावीत एवढे मार्क की पैकीच्या पैकी त्यामुळे गुणांचा फुगवटा वाढत चालला. आज 98 टक्के मिळाले तरी त्याचे काही वाटत नाही. प्रत्येक शाळेतील मुले ही नव्वद टक्के च्या पुढे घेणारी नव्वद टक्के मुले आहेत. बाकी 98% घेणारी मुले. महाराष्ट्र भर हे चित्र पहावयास मिळते. त्यामुळे ही गुणवता खरी की खोटी हे समजे नासे झाले आहे. परीक्षेचा पॅटर्नही बदलला त्यामुळे गुणांची टक्केवारी वाढत गेली. पालकांच्या अवास्तव अपेक्षा वाढत गेल्या. पुढे मुले मेडिकल ला गेलीच पाहिजे हा हट्ट मुलांच्या जिवावर उठतो. सर्वच मुले त्यात यशस्वी होतात असे नाही. बहुतांश पालक आपले स्वप्न मुलावर लादतात. अपेक्षाच्या ओझ्याने मुले दबून जातात. मुलांनी काय करावे ? काय नाही ? याची जुळवाजुळवी पालक करू लागले. मुलांच्या आवडी निवडी, गुणवत्ता, करण्याची क्षमता आदी बाबी झुगारून मुलांना करिअर च्या क्षेत्रात ढकलू लागली. मुले प्रचंड ताण तणावत दिसतात. क्लासेस, अभ्यासिका आदी मधून गुरफटून ते समाज, कुटूंब, मित्र, नातेवाईक यांच्या पासून दूर जावून एकाकी झाली. त्यांना सामाजिक जाणिव राहिली नाही. पॅकेज वरून त्याचा दर्जा ठरवू लागला. जो तो यात गुरफटून गेला. केवळ पैसा देणारे क्षेत्र पालक मुलांच्या करिअर साठी निवडू लागले. प्रचंड पैसा कमवायचा. प्रसंगी अनैतिकतेचाही वापर करायचा. त्यामुळे संवेदना शून्य समाज निर्माण होत आहे. स्वत: पलिकडे पहाण्यास कुणालाही वेळ नाही. एकीकडे शासकीय नोकऱ्या संपल्या. भरती बंद झाल्या. बेकाराचे तांडेच तांडे गावोगाव निर्माण झाले. दारू व अन्य व्यसनाच्या आहारी जावू लागले. राजकारण्याच्या दावणीला बांधले जावू लागले. गावोगावी झुंडीच झुंडी तयार झाल्या. शेतकऱ्यांच्या मुलांना मुली मिळेना. भयानक शोकांतिका निर्माण झाल्या. हे सर्व सामाजिक वास्तव निट समजून घ्यावे लागेल. मी आणि माझा हे जगण्याचे प्रमुख सूत्र बनले. आज खूप क्षेत्रे उपलब्ध आहेत. मात्र जीवघेणी स्पर्धा, खोटी प्रतिष्ठा यामुळे स्वच्या पलिकडे पहाण्या पलिकडे कुणालाही वेळ नाही. मुलांना केवळ किती गुण मिळाले यावरून आजच्या काळात त्याची गुणवत्ता व दर्जा ठरवू नका. 60 ते 70 टक्के गुण घेणारा विद्यार्थी ही पुढे जावू शकतो. कमी गुण मिळाले म्हणून मुलांना टोमणे मारू नका. मायबापांना प्रतिष्ठेसाठी टक्केवारी हवी आहे. केवळ टक्केवारी तुमचे भवितव्य घडवू शकत नाही. मुलांचा कल, आवड निवड, क्षमता पाहुन त्याला घडवू द्या. या जगात त्याला मोकळा श्वास घेवू द्या. प्रत्येकच मुले डॉक्टर, इंजिनियर, अधिकारी होणार नाही. जे होतील त्यांचे अभिनंदन. जे नाही होणार ते अन्य क्षेत्रात मोठे होवू शकतात. आजचे युग हे व्यवस्थापना चे आहे. कमी शिकलेले व न शिकलेले ही प्रचंड संपत्ती, पद, प्रतिष्ठा कमावतात. टक्केवारी वर यश अपयश ठरत नाही . प्रत्येकाचा पींड व स्वभाव धर्म हा वेगळा असतो. त्यामुळे मुलांना केवळ गुणावरून टॉर्चर करू नका. त्याला आत्मभान द्या. धीर द्या व पुन्हा नव्याने स्पर्धेला सामोरे जाण्याची हिंमत द्या. आज राज्यभर 98% घेणारे अनेक विद्यार्थी सापडतील. आडमार्गी गावातील कॉलेज मध्ये प्रवेश घेवून मॅनेज करण्याचे प्रमाणही बरेच आहे. जे यशस्वी झाले त्यांचे अभिनंदनच. मात्र कमी गुण मिळाल्यामुळे मुलांना कमी समजू नका. जास्त टक्केवारी मिळाली म्हणून हुरळून जावू नका ! व कमी गुण मिळाले म्हणून खचू नका. खरा कस हा पुढेच लागतो. तो शेवटपर्यंत स्पर्धेत टिकला पाहिजे. पुढील जीवनाला धिरोदात्तपणे सामोरे जा ! केवळ नोकरीच जिवनाचे सर्वस्व आहे असे अजिबात नाही. आज खूप क्षेत्रे तुमच्या अवती भोवती आहे. ती तुम्हाला खुणावत आहे.आडमार्गी च्या गावी प्रवेश न घेता चांगल्या दर्जेदार शाळा, महाविद्यालयात प्रवेश घेवून पुढील यशाचे व आपल्या जीवनाचे शिल्पकार व्हा !

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १५ मे २०२५

# 'शिवाजी हुसे यांची नदी विषयीच्या आत्मियतेची कविता'



### 'नदी होता आली पाहिजे'

प्रत्येकालाच नदी होता येणार नाही
पण -
नदीचा प्रवाह होता आला पाहिजे
जगणं नेहमी माणसांचं
वाहत्या पाण्यासारखं पाहिजे.
स्वच्छ, नितळ, निर्मळ नी
निर्मोही..
पण सोपं नसतंच मुळी नदी होणं
ती किती किती देते आपणास
आयुष्याला पुरून उरणारं
आपण फक्त घेतच आलोय
तिचा फायदा
तिचा मात्र एकही गुण घेता येत नाही, आपणास
ती जगणं आणि जीवनही सोपं करते अगदी सहजपणे
आपण मात्र उगाच त्रागा करीत जगत असतो पावलो
पावली
निखळ माणूस म्हणून माणूसकीची गाणी गात
जीवनाचा चौखूर उधळता आला पाहिजे..
उगाच खोटे खोटे जगण्यात काय मजा
नदी आपल्या अस्तित्वाला पुरून उरणारी असते
आणि
शेवटी ही आपणास तिच्या कुशित ती सामावून घेते...
ती देतच रहाते
घेत मात्र काहीच नाही
म्हणून,
आपणास
निखळ आनंदासाठी आणि
निर्भेळ जगण्यासाठी
नदी होता आली पाहिजे....

या कवितेत कवी डॉ.शिवाजी हुसे वाचकांना,श्रोत्यांना अत्यंत मौलिक सल्ला देतात.जणू या कवितेतून ते जगण्याचा एक बहुमोल कानमंत्र देतात, की ज्या मंत्राने प्रत्येक मनुष्याचे जगणे अत्यंत सुखकर होईल. त्याचबरोबर प्रत्येक मनुष्याचे मनही वाहत्या पाण्यासारखे स्वच्छ,नितळ,निर्मळ आणि महत्त्वाचे म्हणजे निर्मोही बनेल. निर्मोही म्हणजे,'ज्या मनाला कधीही,कोणत्याही गोष्टीचा मोह होणार नाही असे.' आजकाल प्रत्येक माणूस हा स्वार्थात गुंतून गेलेला आहे. कोणाला कोणासाठी वेळ नाही. ना त्याला दुसऱ्याला मदत करण्यासाठी किंवा कधी दुसऱ्याविषयी चांगला विचार करण्यासाठी. दुसऱ्याचा विचारही कधी करायचा झाल्यास,फक्त त्याच्याविषयी राग,द्वेष,हेवा,मत्सर,घृणा, त्याच्याविषयी वाईट चिंतने बस एवढेच.

"जगात फक्त माझेच चांगले व्हावे,बाकीच्यांचे नाही." सतत असा विचार मनात घोळवणारे व्यक्तिमत्व आजकाल अवतीभवती खूप वाढले आहे. मनुष्याच्या या आजकालच्या वाढत्या वाईट मनोवृत्तीमुळे कवीचे मन अस्वस्थ,खिन्न,उदास,बेचैन झाले आहे.अशावेळी कवी नदीचा आधार घेतात. नदीतटावर तासनतास एकटेच बसून,तिच्या प्रवाहाकडे एकटक बघत राहतात. नदीची गाणी मनात आठवत आणि साठवत सहजच कवीला वाटते,की खरोखरच मनुष्याला नदी होता आले पाहिजे. त्यामुळे मनुष्याचं जगणं,एकंदरीत त्याचं सारं जीवनच सोपं होऊन जाईल. माणसालाही नदीप्रमाणे माणुसकीची गाणी गाता येईल. निखळ माणुसकी जपता येईल. ज्याप्रमाणे नदी तिचा प्रवाह मुक्तपणे कुठेही वाहून नेते, तिच्याजवळ कुठलाच भेदभाव नसतो.तिच्याकडे स्वार्थ, हेवादावा नसतो. ती मुक्तछंदपणे आनंदाची उधळण करत वाहते. सर्वांना जीवनदान बहाल करते. तिच्याकडे आहे तोपर्यंत ती देत राहते. कधीही कुठेही न थांबता किंवा न थकता तिला फक्त आणि फक्त देणेच समजते.तिला घेणे माहिती नाही.कुठलीही स्वार्थाची अपेक्षा न करता जिला फक्त देणेच कळते.अशी फक्त आणि फक्त आपली नदीमायच असते. ज्याप्रमाणे माय आपल्या लेकरावर कधीही रुसत नाही. निस्वार्थी भावनेने, निर्मळ मनाने प्रेम करते. तिच्या लेकरांनी कितीही तिचा दु:सास केला तरी ती लेकरांना कधीच दूर लोटत नाही. प्रेम आणि प्रेमच करते, तशीच ही नदी म्हणजे प्रत्येकाची माय असते. तिला फक्त देता येते. घेणे हे तिच्या शब्दकोशातच नसते. प्रत्येकालाच ती एवढे भरभरून देते,की तिचे देणे सारे त्याच्या आयुष्याला पुरून उरणारे ठरते. अशावेळी आपणही फक्त तिच्याकडून घेतच येतो. पण आयुष्यात एकदाही आपण तिच्या बाजूने विचार करीत नाही,की ती मला एवढे भरभरून देते,तिचे माझ्यावर आयुष्यभर पुरून उरेल एवढे जन्मजन्मांतरीचे,अनंत उपकार आहेत.अशावेळी माझेही तिच्यासाठी काही करण्याचे कर्तव्य आहे.हा विचारच आपण कधी करत नाही. 'हक्क, अधिकार असतात,तसेच मनुष्याचे कर्तव्यही असतात.' ही बाब आपण कधी लक्षातच घेत नाही.मनुष्यप्राण्याच्या वर्तणुकीमुळे आज नद्यांचा श्वास गुदमरलाय.दम घुसमटायला लागलाय.त्यांचे अस्तित्वच धोक्यात आले आहे.माणूस घेण्याच्या नादात,देणेच विसरला आहे.स्वार्थाने त्याची संपूर्ण कळा डबडबली आहे.हक्क, अधिकारासाठी आज लढतो आहे. संघर्षितो आहे. आंदोलने,जाळपोळ,लुटालुट करतो आहे. पण या नादात तो त्याची कर्तव्ये विसरला आहे. त्याला हे कळत नाही, की हक्क आणि कर्तव्य एकाच नाण्याच्या दोन बाजू असतात. हक्कासाठी जसे आपण लढतो,तसे कर्तव्यासाठीही आपण दिवस-रात्र झटले पाहिजे.नदी जर आपल्याला भरभरून देते, आपला, अन्यजीवांचा,सजीव सृष्टीचा,निसर्गाचा प्राण वाचवते, तर आपलेही कर्तव्य तिचे नष्ट होत चाललेले जीवन आपण वाचवायला हवे.कमी होत चाललेले पात्र वाचवले पाहिजे. तिची खुदाई व रुंदीकरण व्हायला हवे.कारण 'नदी वाचली,तर निसर्ग वाचेल.' 'निसर्ग वाचला,तर जीवसृष्टी वाचेल.' आणि 'जीवसृष्टी वाचली,तर मनुष्य जीवन वाचेल, सजेल आणि फुलेल.' हे सर्व सत्यात उतरवायचे असेल, प्रत्यक्षात उतरवायचे असेल तर, 'प्रथम माणसाला नदी होता आले पाहिजे.' म्हणजे नदीच्या वेदना, तिच्या भावना आपल्याला कळतील. नदीसारखं स्वच्छ,नितळ,निर्मळ मन तुमचं तयार होईल. पण कवी नंतर हेही मान्य करतात,की प्रत्येकालाच नदी होता येणार नाही.किमान नदीचा प्रवाह तरी होता आला पाहिजे.यामागे कविची खूप मोठी अपेक्षा आहे.नदीचा प्रवाह बनून त्या प्रवाहाबरोबर वाहणं माणसानं शिकलं पाहिजे.इथे काहीसं प्रवाहाच्या विरोधात वाहणं कविला मान्य नाही असं दिसतं.कारण प्रवाहाच्या विरोधात वाहण्याचा प्रयत्न केला,तर कदाचित मोडून पडण्याची किंवा संपण्याची भीती काहीशा प्रमाणात कविला येथे वाटते आहे. कारण कविला माहिती आहे की,"महापुरे झाडे जाती,तिथे लव्हाळे राहती." हे संत तुकारामाचे वचन कवीला पूर्णपणे ज्ञात आहे.प्रवाहाला विरोध केला,तर मोठ-मोठे झाडेही उन्मळून पडतात.पण त्याच ठिकाणी लव्हाळे(एक लहानशी वनस्पती) मात्र त्या प्रवाहाबरोबर वाहतात किंवा प्रवाहासी स्वतःला जुळवून घेतात. प्रवाह येताच थोडे झुकतात व प्रवाह पुढे गेला,की परत तितक्याच ताठ मानेने,डौलाने उभे राहतात. म्हणून 'प्रत्येकालाच नदी होता येणार नाही, पण प्रत्येकाला नदीचा प्रवाह होता आला पाहिजे' असे कवीला वाटते. वाहत्या प्रवाहाबरोबर आपणही प्रवाह बनवून राहिलो,तर जगण्याचा निर्भेळ आणि निर्मोही आनंद घेता येईल. पुढे कवीने मात्र त्यांची खंत व्यक्त करतात.कवी म्हणतात की इतकं सारं नदी माय आपल्याला वाटत असते,देत असते,पण आपण मात्र त्या बदल्यात तिला काहीच देत नाही.आपण फक्त तिचा फायदाच घेत आलोय. मात्र आपल्याला तिचा एकही गुण घेता येत नाही.तिला जर आपण काही देऊ शकत नाही,तर किमान तिचा एखादा गुण घेऊन तरी आपण आपले जीवन, आयुष्य सुखकर करायला हवे. असे कवीला सतत वाटत असते. नदी ज्याप्रमाणे माणसाने तिच्या पात्रात केलेली सारी घाण स्वत:सोबत वाहून नेते व पुन्हा आपल्याला स्वच्छ,निर्मळ पाण्याचे दान देते,हजारो खडकांना आदळते,आपटते पण कधीच रडत बसत नाही आणि तिचे वाहने कधी थांबवत नाही. लाखो काट्याकुपाट्यांना आपल्या सोबतच वाहत नेते. पण कधी कुणावर रुसत नाही. पात्रातील सारी घाण बाजूला सारून आणि पुन्हा नवे रूप धारण करून,पुन्हा जीवांच्या सेवेत सदा हजर होते.असा नदीचा एखादा गुण मनुष्याने घेतला,तर माणसाच्या जीवनाबरोबरच,माणसाचे अंतर्मनही नदीप्रमाणे स्वच्छ, निर्मळ होऊन जाईल.माणूसही निस्वार्थी भावनेने फक्त देणे शिकेल.माणसातले प्रेम वाढेल. व माणसाच्या नात्यात माणुसकीची सुंदर गुंफण तयार होईल.उगाच खोटं खोटं जगणं कविला मान्य नाही.तशा जगण्यात त्यांना मजा वाटत नाही.पावलोपावली त्रागा करत जगणं कविला नको आहे.तर उलट नदीच्या प्रवाहाप्रमाणे जीवनात सतत माणुसकीची गाणी गात,आनंदाची उधळण करीत जीवन वाहतं ठेवत जगायला हवे आणि हेच कविला इथे अभिप्रेत आहे. कविच्या मनातील माणुसकीचं जग तयार होण्यासाठी शेवटी कवी म्हणतात की,"आपल्या निखळ आनंदासाठी आणि निर्भेळ जगण्यासाठी प्रत्येकाला नदी होता आले पाहिजे." प्रत्येकाला नदी होता आले पाहिजे.....

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002